# पर्यावरण संरक्षणाचे स्त्रीवादी राजकारण

**रेखा हिंगोले**
राज्यशास्त्र संशोधक मार्गदर्शक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड

जेव्हा पर्यावरणाच्या प्रश्नाला जागतिक राजकारणात महत्त्व येऊ लागले तेव्हा स्त्री विद्वानांनी पर्यावरण व स्त्रीप्रश्न यांचे नाते सांगण्याचा जो प्रयत्न केला त्यालाच पर्यावरणवादी स्त्री राजकारण असे ढोबळ मानाने संबोधले जाते. जेन्डर पॉलटिक्स पाश्चात्य जगात फार पूर्वी आले आहे. भारतात ते नव्याने रुढ होत आहे. पर्यावरणाच्या प्रश्नावरुन भांडवली शक्तीच्या विरोधात जागतिक पातळीवर ज्या शक्ती काम करतात, जी सैध्दांतिक मांडणी करतात त्याला ग्रीन पॉलीटिक्स असे संबोधले जाते. जर्मनीमध्ये ग्रीन पार्टी अशा नावाचा एक राजकीय पक्ष सक्रीय असून तो शासनाच्या पर्यावरग विनाश धोरणांचा विरोध करीत असतो. ग्रीन पॉलीटिक्स स्त्री सक्षमीकरणाचा एक भाग असू शकतो हे अजून भारतातल्या स्त्री चळवळींना ज्ञात झाले नाही. त्यांच्या मांडणीला आता कुठे हळूहळू मान्यता मिळत आहे. शिवा वंदना व बिना अग्रवाल यांनी स्त्री चळवळीचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचे काम सातत्याने केले आहे. त्यांच्या मते सध्याची भांडवली सत्ता यांनी पर्यावरणाचा विनाश करुन ग्रामीण व आदिवाशी स्त्रीयांपुढे जगण्याचे प्रश्न निर्माण केले आहेत. हा अमानवीय भांडवली विकास असाच चालू राहिला तर स्त्रीयांना रोजच्या दैनंदिन जीवनाच्या निर्वाहच्या गरजा भागविणे दिवसेंनदिवस कठीण होत जाईल. हिमाचल प्रदेशमध्ये एक सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, वैरण गोळा करण्यासाठी स्त्रीला आपल्या आयुष्यातले दररोज दोन तास द्यावे लागतात. तोच वेळ तीला शिक्षणासाठी देता आला असता तर तिचे आयुष्याचे बरेच प्रश्न सुटू शकले असते. सबब या अमानवीय भांडवली विकासाविरोधी स्त्रीयांनी एकत्र येवून स्वहित रक्षणार्थ राजकारणात स्वतःचा दबाव गट निर्माण करावा. मिस मारिया, गॅब्रिएल डट्रीच यांनी आठव्या जागतील स्त्री अभ्यास परिषदेच्या चर्चेत स्त्री आणि निसर्ग यांचे जवळचे नाते सांगून निसर्गाचे संवर्धन, संगोपन यातच स्त्री कल्याण दडले आहे असे सुत्र ठेवले. वंचितासाठी रोजची जगण्याची पध्दत हीचमुळी अस्तित्त्वाचा संघर्ष असतो. जे जे खाजगी असते ते ते राजकीयच असते. स्त्रीयांनी खाजगी प्रश्नापासून स्वतःला अल्पित राखू नये उलट राजकर्त्यांनी निसर्गा बरोबर सहकार्य करणारे धोरण आखावे म्हणून त्यांच्यावर दडपण आणावे. निसर्गानी उपलब्ध केलेली पाणी, जमीन, जंगल पर्यावरण याचे बाजारपेटीय व्यवस्थेपासून रक्षण व्हावे म्हणून चळवळी उभ्या कराव्यात किंवा अश प्रश्नावर काम करणाऱ्या चळवळीशी सहकार्य करावे. विश्वाची सामाजिक आर्थिक पुनर्रचना एका नव्या पध्दतीने भांडवली व्यवस्थेत होत आहे. ही पुनर्ररचना स्त्री हिताची नाही. लॅटीन अमेरिका, आशिया खंडत बेसुमार होणाऱ्या जंगल तोडीमुळे छोटे शेतकरी श्रीमंताच्या जमीन खरेदीच्या रेटयामुळे डोंगराळ भागात फेकले जात आहेत. वृक्षतोड झाल्याने ग्रामीण आदिवाशी स्त्रियांना जळण, वैरण, कंदमुळे, फळे, फुले, डिंक, औषधी, पणी हया समस्या भेडसावीत आहेत. नव्या व्यवस्थेत आदिवाशी जमातीच्या शोषणाची एक नवी व्यवस्था आकरास येत आहे. दिवसें दिवस त्याचे परावलंबन, निर्बलीकरण होत आहे. विकासाच्या नावाखली भांडवलदाराचे भले करणाऱ्या व पर्यावरणाचा विनाश करणाऱ्या योजना आखल्या जात आहेत. त्याला स्त्रियांनी विरोध केला पाहिजे. विकासाचे नवे प्रतिमान आदिवाशी, भटके, ग्रामीण स्त्रियांना डोळयासमोर ठेवून आखण्यात यावे. हुंडयासाठी सागरी किनाऱ्यावरुन शेतकरी कुटुंबे स्वतःची मासेतळेजमीन विकून सावकारांच्या जमिनीवर कोलंबी सोलन्याचे काम करीत आहेत.

आरोग्य तंत्रज्ञान व चुकीच्या पध्दतीने केली जाणारी श्रमाची फेररचना आणि महत्त्वाच्या क्षेत्रातून स्त्रियांचे होत असलेले शोषण ही सध्याची चिंतेची बाब आहे. गरिबांना भांडवली व्यवस्थेत अथपूर्ण जीवन जगता येत नाही भांडवली विकासात टिकून राहायचे असेल तर नवि कौशल्ये संपादित करुन भांडवली अर्थ व्यवस्थेच्या पलिकडे जाणारी क्रियाशक्ती उत्सर्जित करावी लागेल. असे झाले तरच आदिवाशी वंचितांचे जगण्याचे प्रश्न थोडे फार सुसहय होतील.

महात्मा गांधी आणि रुसो यांनी निसर्गाकडे परत चला अशी घोषणा केली होती. त्याचा अर्थच असा होता की, गरजेपूरते निसर्गाचा वापर कराव व निसर्गाला हवे तेवढे संगोपनासाठी परत करा. मिस मारिया यांनी पर्यावरणवादी स्त्रिवाद (1993) या ग्रंथात म्हणतात की, डोंगराळ भागातील स्त्रियांच्या गरजा विशेषतः घर, ऊर्जा, पाणी, वैरण, जळण हया निसर्गाकडून भागविल्या जात असल्याने पर्यावरणाच्या विनाश विरोधी जगभराच्या तळागळातील समुहानी एकत्रित येऊन भांडवली शक्ती विरोधी संघर्ष करावा. निवडणूकीत पर्यावरण संरक्षणाला अनुकूल भूमिका घेणाऱ्या पक्षांना मते द्यावीत. केवळ तंत्रज्ञान व औद्योगिकरणाने, विकासाचे प्रश्न व मानवी गरजांची पूर्तता होणार नाही. उलट काहीच्या तोंडाचा घास काढून घेऊन भांडवली विकास होत असतो. मुख्या म्हणजेच भौतिक विकास हेच मानवी जीवनाचे उद्दीष्टे असू नये. सर्वांचा समान सनमानजनक विकास हेच उद्दीष्ट असावे. वंदना शिवा यांनी जागतिकीकरणाला पर्याय सुचविणारा कार्यक्रम दिला आहे तो असा–

1) निर्बलांच्या आर्थिक व्यवहाराची उद्दीष्टे निश्चित करुन निसर्गाशी नाते राखून त्यांच्या मुलभूत गरजा भागविणारा विकास व नियोजन आखण्यात यावे.
2) रोजची जगण्याची पध्दत हीच आयुष्याचा संघर्ष व हेच राजकारण असते. स्त्रियांनी अशा राजकारणालाच पाठींबा द्यावा.

3) पर्यावरणाचे संरक्षण राष्ट्रीय कर्तव्याचा भाग मानून मानवी वर्तनाचे नियमन करण्यात यावे.
4) उपयोजित तंत्रज्ञानाच्या विकासावर भर द्यावा असे तंत्रज्ञान लोक विज्ञानावर आधारीत असावे.
5) लोक सेवांचे खाजगीकरण करु नये.
6) पर्यावरणवादी स्त्री चळवळ बळकट करावी.

बिना अग्रवाल यांनी आपल्या लिंग भाव व पर्यावरण विषयक चर्चा (1991) या ग्रंथात म्हणतात की, पारंपारिक पिका ऐवजी नगदी पिके, कोरडवाहू शेती ऐवजी ओलीता खालील शेती, छोटया धरणा ऐवजी मोठी धरणे ही विकासाची दिशा गरिबांचे निर्बलीकरण करणारी आहे. विकासीच वर्गवारी करतांना एखाद्या देशातील स्त्रीया असे सरसगट मोजू नये. कारण सर्वच स्त्रीया एकाच आर्थिक स्थरात नसतात. त्या ऐवजी निर्वाहांच्या साधनांच्या उपलब्धतेनुसार स्त्रियांची आर्थिक वर्गवारी रेखांकित करण्यात यावी. ज्यांच्याकडे खूप कमी निर्वाहाची साधने असतील त्यांना ज्यादा मदत देणे राज्यावर बंधनकारक असावे. ग्रामीण भागातील पारंपारीक ज्ञान व साधने सुरक्षित राखण्याचे कर्तव्य राज्याने पाडावे. निसर्ग आणि माणूस यांचे नाते मित्रत्वाचे सहकार्याचे असते हा विचार प्रभावी करावा.

**संदर्भ सूची**


1) बिना अग्रवाल (1991) सामाजिक सुरक्षितता आणि कुटूंब संस्थाः ब्लॅरेडन प्रेस ऑक्सफर्ड.
2) बिना अग्रवाल (1994) लिंगभाव आणि मालमत्तेवरील हक्कः दक्षिण आशियातील आर्थिक विश्लेषणः कॉली फार वुमेन नवी दिल्ली.
3) मैत्रेय कृष्णराजः (1988) स्त्रीया आणि विकासः शुभदा, पुणे
4) शिवा वंदना : स्त्रीया आणि पर्यावरण आणि आर्थिक जागतिकीकरणरु सिस्टिम व्हिजन, दिल्ली.